**B.A. Part—II Semester—IV Examination**

**(Literature of Modern Language)**

**MARATHI LITERATURE**

वेळ : 3 तास] [एकूण गुण : 80

**सूचना :**—(1) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(2) बहुपर्यायी प्रश्नांसाठी सुरुवातीस सोडविलेल्या प्रश्नांची उत्तरे मूल्यांकन करतांना गृहित धरल्या जातील.

1. संदर्भासह स्पष्टीकरण करा : 16

(अ) ''अरे तू खूप सिकलास म्हणे व आता चांगली मोठी लेक्चाररची नोकरी बी लागली म्हणे. आता काय मजाच मजा है तुझी.''

**किंवा**

''अरं परलाद्या ! काय झालं तुला दुदग्या. चांगलं खाल्ल्याघरचे वासे मोजायलाईच तू. का बसलाय घरी.''

(आ) ''अरे तुम्ही सारे सरकारचे जावई ! उगीच गपचीप जे दिलं ते खाण्यापेक्षा किरकिर का करायचं ? तुम्हाला सरकारनं सारं दिलंय आता फक्त पोरी देयाच्या राहिल्यात.''

**किंवा**

''तुमकू मालूम नहीं अब मेरा ईरनाक दोस्त होता तो परलाद का शिक्षान देखते कितना खुशी मनाता लेकीन क्या करना ये तो सब खुदाकी ओर है।''

(इ) ''हां गा : एं रानींवनीं असति : तृण खाति : नदीबाहाळाचीं उदकें पीति : यांते तुम्ही कां गा मारा ? एं तुमचें काइ करीति ?''

**किंवा**

''आइ : मी दसरथु : पाणिएड राखतू होता : श्रावणु कमंडलु भरूं आला. कमंडलु भुडभुड वाजीनला : सावज आलें म्हणौनि बाणु घातला.''

(ई) ''गावा हस्ति आला : ते जात्यंध हस्ति पाहों गेले : एके पावो देखीला : एके सोंड देखीली : एकें कानु देखीला : एके पाठि देखीली : एके पोट देखीले : एके पुंस देखीलें :''

**किंवा**

''जी जी : जाणेंवीण कळा माळवलीया जी : जाणेंवीण कळा पोरटीया जालीया जी : आजि कळेचें माहेर भेटलें : गोसावी सकळ वीद्येचें माहेर:''

2. 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनातून व्यक्त झालेल्या जातिव्यवस्थेवर सविस्तर प्रकारा टाका.

**किंवा**

'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनातील प्र.ई. सोनकांबले यांच्या जीवनसंघर्षाचे चित्रण करा. 16

3. (अ) ''आठवणींचे पक्षी' या आत्मकथनातील भाषिक वैशिष्ट्ये लिहा.

**किंवा**

'आठवणींचे पक्ष' या आत्मकथनातून व्यक्त झालेले 'आक्का' व 'मुकताबाई' यांचे व्यक्तिचित्र लिहा. 8

(आ) 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनात तत्कालीन शिक्षण पद्धती व अलीकडील शिक्षणपद्धती यातील फरक प्र. ई. सोनकांबळे यांनी कसा अधोरेखित केला आहे ? ते लिहा.

**किंवा**

'आठवणींचे पक्षी' मध्ये 'विनायक मास्तर' व 'भीमराव बापू' यांच्याबद्दलचा अनुभव प्र. ई. सोनकांबले यांनी कसा रेखाटला आहे ? ते तुमच्या शब्दांत लिहा. 8

4. (अ) 'लीळाचरित्रातील निवडक कथांतून श्रीचक्रधर स्वामींच्या अलौकिक व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते' ते लिहा.

**किंवा**

लीळाचरित्रातील निवडक कथांच्या आधारे तत्कालीन समाजजीवनावर प्रकाश टाका. 8

(आ) लीळाचरित्रातील निवडक कथांच्या आधारे पक्षीकथा व प्राणीकथांची ओळख करून द्या.

**किंवा**

'लीळाचरित्रातील निवडक कथांतून महानुभाव संप्रदायाच्या तत्त्वज्ञानावर प्रकाश पडतो' ते सोदाहरण विशद करा. 8

5. खालील वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांसाठी अचूक उत्तर निवडा :

(1) प्रल्हाद बाभळीची साल कोणाला विकत असे ?

(अ) हिप्पळगावचे उंटवाले (ब) नरसिंगा ढोर

(क) हनमा मांग (ड) म्हसाजी मांग

(2) प्रल्हादचा औरंगाबादला ? ला फोटो कोणी काढला होता ?

(अ) महंमदभाई (ब) गवरदीन

(क) रुकमदीन (ड) शाबुदीन

(3) प्रल्हाद हडोळतीला शिक्षण घेत असताना त्यांचे __________ हे मित्र घोड्यावरून शिकायला येत होते.

(अ) रतनसिंग — संगमसिंग (ब) राजपाल — सुधाकर देशमुख

(क) बापू — बाबू पवार (ड) विद्यासागर — प्रल्हाद कोमटी

(4) हडोळतीला प्रल्हादला मराठी हा विषय शिकविण्यासाठी __________ हे गुरुजी होते.

(अ) शेळके (ब) रामलिंगप्पा

(क) विनायकराव (ड) वासुदेवराव पिंपळे

(5) प्रल्हादच्या लहान बहिणीचे नाव __________ होते.

(अ) सकुबाई (ब) मुगताबाई

(क) गंगा (ड) पुष्पाबाई

(6) प्र.ई. सोनकांबले यांची १ली चप्पल __________ रूपयाची होती.

(अ) बीस (ब) दहा

(क) दोन (ड) पाच

(7) हडोळतीला शिक्षण घेत असताना प्रल्हाद व __________ या मित्रामध्ये काही गोष्टी समान होत्या.

(अ) राजपाल (ब) धर्मा

(क) दासू कोडगिरे (ड) कोळ्याचा बाबू

(8) राजूरच्या शाळेत असताना प्रल्हादला कोणता आजार झाला होता ?

(अ) ताप (ब) खरूज

(क) हगवण (ड) कवूळ

(9) 'सत्यापूर' या गावाचे 'बळ्हेगाव' असे नामकरण कोणाच्या शापामुळे झाले ?

(अ) श्रीचक्रपाणी (ब) श्रीगोविंदप्रभू

(क) मांडव्य ऋषी (ड) अगस्ती ऋषी

(10) बोणेबाई ही श्रीचक्रधरांना खालीलपैकी कोणत्या नावाने संबोधत असे ?

(अ) वनदेव (ब) मौन्यदेव

(क) चक्रवर्ती (ड) श्रीचक्रपाणी

(11) 'गोलडी गाय कथन' या लीळेत खालीलपैकी कोणत्या दोन भाषिकांत संवाद झाला आहे ?

(अ) गुजराती व मराठी (ब) कानडी व मराठी

(क) पंजाबी व मराठी (ड) राजस्थानी व मराठी

(12) श्रीचक्रधरस्वामी यांच्या वियोगात मृत्यू पावलेल्या कुत्र्याचे नाव काय होते ?

(अ) डांगरदेव | (ब) महात्मा
(क) डोंगरदेव | (ड) विष्णूस्वामी

(13) श्रीचक्रधर स्वामी हे ब्राह्मणाच्या घरी गोपालक म्हणून काम करण्यास खालीलपैकी कोणत्या अटीवर तयार झाले ?

(अ) अधिक मजूरी दिल्यास
(ब) गायी शेतात बांधेन व तिथेच त्यांचे रक्षण करीत
(क) गायी राखूपण दूध काढणार नाही, सोडेनपण बांधणार नाही
(ड) पूर्वीचा गोपालक वापस येईपर्यंत

(14) श्रीकृष्णाने 'राजसूइं यज्ञा' प्रसंगी जेवणाच्या पंगतीमध्ये वाढण्याचे कोणते काम घेतले होते ?

(अ) पोळी | (ब) तूप
(क) भात | (ड) खीर

(15) ____________ या ग्रंथात श्रीचक्रधरस्वामींच्या आठवणी संकलित केल्या आहेत ?

(अ) लीळाचरित्र | (ब) ऋद्धिपूर वर्णन
(क) सह्याद्रीवर्णन | (ड) ज्ञानप्रबोध

(16) 'एथं सरण आलेयां काई मरण असे ?' हे वाक्य खालीलपैकी कोणत्या लीळेतील आहे ?

(अ) द्विजगोरक्षण | (ब) ससीकरक्षणं
(क) श्रावणा भगति कथन | (ड) गोलडी गाय कथन

16×1=16

139 139 139 139 139